**विषय:**-नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि. ०६/०२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त..

मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखाली नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि. ०६/०२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नागपूर यांनी मान्यतेसाठी सादर केले आहेत. या इतिवृत्तामध्ये विषयसूची मध्ये एकूण १० विषय असून त्यामधील विषय ५ व ७ या कार्यासनाशी संबंधित असून उर्वरीत विषय नवि-७ या कार्यासनाशी संबंधित आहेत.

| विषय सूचीतील अ.क्र. | विषय | प्रस्ताव | अभिप्राय |
|---|---|---|---|
| ५ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडून मंजूर असलेले अधिकृत भूखंडावरील दि. ३१/१२/२०१५ नंतरची सक्षम प्राधिकरणाची मंजूरी न घेता केलेली बांधकामे आणि चटई क्षेत्र, पार्किंग व समोरील समांस अंतराचे उल्लंघन वगळून केलेली विसंगत बांधकामे शासनाचे दिनांक ०७/१०/२०१७ रोजीचे अधिसूचनेतील मार्गदर्शक तत्वे आणि शुल्क आकारुन प्रशमित करावयाची कार्यवाहीबाबत.. | राज्य शासनाने दि. ०७/१०/२०१७ रोजी दि. ३१/१२/२०१५ पूर्वी झालेल्या अनधिकृत विकाससाचे बांधकामांना प्रशमीत करण्याबाबत नियम तयार केले आहेत.<br>दि. ३१/१२/२०१५ नंतर सक्षम प्राधिकरणाची मंजुरी न घेता जी बांधकाम झालेली आहेत व जी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ कलम १४३ अंतर्गत प्रशमन करण्यायोग्य आहे व त्यांना दि. ०७/१०/२०१७ चे नियमाप्रमाणे प्रशमन शुल्क आकारण्याचे प्रस्तावित आहे. (हे प्रशमन करतांना पार्कींग स्पेस, समोरील समास अंतर व चटई क्षेत्र निर्देशांकाचे उल्लंघन क्षमापीत करण्यात येणार नाही. | शासनाने दि. ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२क अनुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८(१) अन्वये नियम प्रसिध्द केलेले असून सदरचे नियम हे दि. ३१/१२/२०१५ पुर्वीच्या बांधकामासाठी लागू आहेत. सदरचे नियम हे दि. ३१/१२/२०१५ नंतरच्या बांधकामांसाठी लागू राहणार नाहीत. सदर बांधकामासाठी शासनाने नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी दि. ०५/०१/२०१८ रोजी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर करण्यात आली आहे. त्यामधील तरतुदी दि. ३१/१२/२०१५ नंतरच्या बांधकामांना लागू राहतील.<br>महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १४३ मधील तरतुदीचा विचार करता यामध्ये प्रादेशिक मंडळ किंवा नियोजन प्राधिकरण किंवा विकास प्राधिकरणाला किंवा त्या द्वारे तयार केलेल्या नियमानुसार अपराधाचा निकाल सामोपचाराने करता येईल असे तरतूद आहे.<br>महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे |
| ७ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांच्या दि. ०७/१०/२०१७ च्या अधिसूचनेप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५२ क अनुसार अनधिकृत बांधकाम प्रशमन आकार लावून | दि. ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील नियम क्र. १३ (a) (ii) नुसार प्रशमन शुल्क विकास शुल्काचे दुप्पट पेक्षा कमी नसावे असे प्रावधान आहे. त्याबाबत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण याद्वारे प्रशमन शुल्क = विकास | |

| | | | |
|---|---|---|---|
| | "प्रशमीत संरचना" म्हणून घोषीत करण्यासाठी अधिनियमाच्या कलम १५८(१) अन्वये केलेले नियमाप्रमाणे इमारत बांधकाम नियंत्रण नियमावलीशी सुसंगत बिना परवानगीने दि. ३१/१२/२०१५ पूर्वी केलेली अनधिकृत अभिन्यास आणि अनधिकृत भूखंडके प्रशमित करण्याकरीता प्रशमन शुल्काचे दर निश्चित करण्याबाबत. | शुल्काचे दुप्पट करणे प्रस्तावित आहे. | कलम ५३(१) अन्वये नियोजन प्राधिकरणाने अनधिकृत बांधकामासाठी नोटीस बजावल्यानंतर या नोटीशीच्या अनुषंगाने अर्जदार यांना कलम ४४ अन्वये नियोजन प्राधिकरणाकडे बांधकाम नियमानुकूल करण्याबाबतचा प्रस्ताव दाखल करता येऊ शकतो. सदर प्रस्ताव नियोजन प्राधिकरण विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार नियमानुकूल होत असेल तर कलम ४५ अन्वये विकास परवानगी देऊ शकतात. अश्या परवानग्या देताना प्रशमन शुल्क आकारण्यासाठी नागपूर महानगर विकास प्राधिकरण यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १४३ अंतर्गत शासनाच्या दि. ०७/१०/२०१७ रोजीच्या नियमाप्रमाणे प्रशमन शुल्क आकारण्याचे प्रस्तावित केले आहे. शासन निर्णयातील नियम क्र. १३ (a) (ii) नुसार प्रशमन शुल्क विकास शुल्काचे दुप्पट पेक्षा कमी नसावे असे प्रावधान आहे. त्याबाबत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण याद्वारे प्रशमन शुल्क = विकास शुल्काचे दुप्पट करणे प्रस्तावित केले आहे. |

माहितीस्तव सादर.

----------------

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

स्टेशन रोड, सदर, नागपूर – ४४०००१

फोन नं. ०७१२– २५३३७२५, फॅक्स नं. ०७१२– २५४०१६७

क्रमांक : साप्रवि/आ.वि./एन.एम.आर.डी.ए./029 नागपूर, दिनांक : ५/३/२०१८

प्रति,

**मा. प्रधान सचिव,**

नगर विकास–१,

मंत्रालय, मुंबई – ३२

**विषय : नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ६/२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे ईतीवृत्त मान्यतेबाबत.**

महोदय,

मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखाली नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ६/२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतीवृत्त यासोबत मान्यतेस सादर करण्यात येत आहे. कृपया ईतीवृत्तास मान्यता प्रदान करण्यात यावी. ही विनंती.

(मान्यतेने)

आपला विश्वासू

५/३

महानगर आयुक्त

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

नागपूर करिता

3

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

स्टेशन रोड, सदर, नागपूर – ४४०००१.

फोन नं..०७१२-२५३३७२५, फॅक्स नं.०७१२-२५४०१६७

क्रमांक :

विषय :- नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ०६/०२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता मिळणेबाबत....

महोदय,

दिनांक ०६/०२/२०१८ रोजी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची बैठक मा.अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात आले असून, सोबत जोडलेले बैठकीचे इतिवृत्त सविनय मान्यतेस सादर.

अपर जिल्हाधिकारी

मा.महानगर आयुक्त (ना.म.प्र.वि.प्रा.)

मा.अपर मुख्य सचिव (गृह)

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची द्वितीय सभा

दिनांक ०६ फेब्रुवारी २०१८

अध्यक्ष – मा. अपर मुख्य सचिव
गृह विभाग, महाराष्ट्र शासन

७

# विषय सूची

| अनु. क्र. | विषय | प्रस्ताव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या प्रथम बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे | —— | |
| २ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या प्रथम बैठकीतील निर्णय तथा सुचनांचा अनुपालन अहवाल. | —— | |
| ३ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ६.११.२०१७ रोजीचे सभेत घेण्यात आलेले ठराव अवलोकनार्थ सादर. | —— | |
| ४ | सुमठाणा—कोतेवाडा—सोंडापारा—जामठा—परसोडी सुधार योजने मधील विविध घटकांचे दृष्यनिरिक्षण करण्याकरिता ३ डी वॉकथ्रु मॉडेल आणि ऑडीओ व्हिडीओची निर्मिती करणेबाबत. | सुमठाणा —कोतेवाडा — सोंडापारा — जामठा — परसोडी सुधार योजने मधील विविध घटकांचे दृष्य परिक्षण करण्याकरीता ३ डी वॉकथ्रु मॉडेल आणि ऑडीओ व्हिडीओची निर्मिती कामाची निविदा मे. निल मल्टी मिडीया प्रा. लि. चे नावे मंजूर करण्यात आलेली असून, कार्यवाही समितीचा माहितीस्तव सादर. | — |
| ५ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडुन मंजुर असलेले अधिकृत भुखंडावरील दिनांक ३१/१२/२०१५ नंतरची सक्षम प्राधिकरणाची मंजुरी न घेता केलेली बांधकामे आणि चटई क्षेत्र, पार्किंग व समोरील समास अंतराचे उल्लंघन वगळून केलेली विसंगत बांधकामे शासनाचे दिनांक ०७/१०/२०१७ रोजीचे अधिसुचनेतील मार्गदर्शक तत्वे आणि शुल्क आकारून प्रशमित करावयाची कार्यवाही बाबत. | राज्य शासनाने दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी दिनांक ३१.१२.२०१५ पूर्वी झालेल्या अनधिकृत विकाससाचे बांधकामाना प्रशमीत करण्याबाबत नियम तयार केले आहेत.<br><br>दिनांक ३१.१२.२०१५ नंतर सक्षम प्राधिकरणाची मंजुरी न घेता जी बांधकाम झालेली आहेत व जी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ कलम १४३ अंतर्गत प्रशमन करण्यायोग्य आहे व त्यांना दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ चे नियमाप्रमाणे प्रशमन शुल्क आकरण्याचे प्रस्तावित आहे. (हे प्रशमन करतांना पार्कींग स्पेस, समोरील समास अंतर व चटईक्षेत्र निर्देशांकाचे उल्लघंन क्षमापीत करण्यात येणार नाही.) | UD-9 |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी अस्थाई स्वरूपाचे मनुष्यबळ संस्थे मार्फत बाहयस्त्रोत पध्दतीने सेवा उपलब्ध करून घेण्याच्या निविदा काढण्याबाबत. | महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ मधील कलम 7(3) (i) तरतूदीनुसार निविदा आमंत्रित करून अस्थाई स्वरूपाचे मनुष्यबळ प्राप्त करून घेण्यासाठी बाहय स्त्रोत पध्दतीने कामे (Outsourcing) करून घेण्यासाठी निविदा काढून पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार महानगर आयुक्तास प्रदान करणेबाबत. | — |
| ७ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांच्या दि. ०७/१०/२०१७ च्या अधिसुचनेप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२–क अनुसार अनधिकृत बांधकाम प्रशमन आकार लावुन "प्रशमीत संरचना" म्हणून घोषीत करण्यासाठी अधिनियमाच्या कलम १५८(१) अन्वये केलेले नियमाप्रमाणे इमारत बांधकाम नियंत्रण नियमावलीशी सुसंगत बिना परवाणगीने दिनांक ३१/१२/२०१५ पूर्वी केलेली अनधिकृत बांधकामे आणि रहिवासी झोनमधील अनधिकृत अभिन्यास आणि अनधिकृत भुखंडके प्रशमित करण्याकरीता प्रशमन शुल्काचे दर निश्चित करण्याबाबत. | दिनांक ०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील नियम क्र. १३ (a) (ii) नुसार प्रशमन शुल्क विकास शुल्काचे दुप्पट पेक्षा कमी नसावे असे प्रावधान आहे. त्याबाबत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण याद्वारे प्रशमन शुल्क = विकास शुल्काचे दुप्पट करणे प्रस्तावित आहे. | ✓ UD-9 |
| ८ | आर्थिक वर्ष २०१७–२०१८ चे सुधारित तथा सन २०१८–२०१९ चे अनुमानित अर्थसंकल्पीय अंदाज माहिती व मंजूरीस शिफारस सादर करणेबाबत. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे प्रथम अंदाजपत्रक सन २०१७–२०१८ चे सुधारित व २०१८–२०१९ चे अनुमानित अंदाजपत्रक कार्यकारी समिती समक्ष माहिती व प्राधिकरण्याच्या मंजुरीस शिफारसीस्तव ठेवण्यात येत आहे. | — |
| ९ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण वित्तीय विनियम मसुदा तयार करण्यासाठी समितीचे गठन करणे. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रासाठी वित्तीय विनियम चा मसुदा तयार करण्यासाठी त्रिसदसीय समिती खालील प्रमाणे प्रस्तावित आहे. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **अध्यक्ष** – महानगर आयुक्त,<br>नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण<br>**सदस्य** – अतिरिक्त जिल्हाधिकारी,<br>नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण<br>**सदस्य** ~~सचिव~~ – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नामप्रविप्रा | |
| १० | वेळेवर येणारे इतर विषय | | |

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

बुधवार दिनांक ६ फेब्रुवारी २०१८ रोजी दुपारी ५.३० वाजता (प्रत्यक्ष सुरवात ५.२५ वा.) मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या दालनात नागपूर महागनर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या द्वितीय सभेचा अहवाल.

**सदर सभेला खालील प्रमाणे उपस्थित होते.**

१) **श्री. सुधीर श्रीवास्तव,** भाप्रसे,
अपर मुख्य सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई तथा अध्यक्ष, कार्यकारी समीती.

२) **श्री. नितीन करीर,** भाप्रसे,
प्रधान सचिव–१, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती.

३) **डॉ. दिपक म्हैसेकर,** भाप्रसे,
महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा सदस्य, कार्यकारी समिती.

४) **श्री. अश्विन मुदगल,** भाप्रसे,
आयुक्त, नागपूर महानगरपालिका तथा सदस्य, कार्यकारी समिती.

५) **श्री सुधाकर कुळमेथे**
अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर तथा सचिव कार्यकारी समिती

६) **श्री हेमंत ठाकरे**
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर

७) **उपसचिव**
वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

बैठकीच्या प्रारंभी प्रधान सचिव–१ यांनी बैठकीच्या सुचनेबरोबर दिलेल्या विषयसुचीशी प्रत्यक्ष विषयसुची या मध्ये फरक असल्याबध्दल तिव्र नापसंती व्यक्त केली व हि कार्यपध्दती योग्य नसल्याबध्दल अभिप्राय नोंदविले. महानगर आयुक्तांनी या बाबत दिलगीरी व्यक्त करून हयाची पुर्नरावृत्ती होणार नाही असे प्रतिपादन केले तसेच यापुढे बैठकीच्या सुचनेसह विषय पत्रिका व प्रस्तावित ठरावाबाबत टिपण्णी पाठविण्याच्या सुचना अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा सचिव कार्यकारी समिती यांना दिल्या.

ठराव क्रमांक : १/०२/ ६.२.२०१८

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या प्रथम बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

ठराव : मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यास मान्यता देण्यात आली.

ठराव क्रमांक : २/०२/ ६.२.२०१८

**नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समीतीच्या प्रथम बैठकीतील निर्णय तथा सुचनांचा अनुपालन अहवाल.**

शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. १८९९/११९१/प्र.क्र./८०/९९/नवि–१३, दिनांक २३.०७.१९९९ अन्वये नागपूर महानगर क्षेत्र घोषित केले व दिनांक ०४/०३/२०१७ चा अधिसुचने अन्वये नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना झाली आहे. महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ मधील नियम क्र. ७ प्रमाणे कार्यकारी समितीची रचना आहे. बूधवार दि. ०७ जून २०१७ रोजी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची पहिली बैठक संपन्न झाली.

**उक्त बैठकीमध्ये खालील अधिकारी उपस्थित होते.**

१) **श्री. सुधीर श्रीवास्तव,** भाप्रसे,
अपर मुख्य सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई तथा अध्यक्ष, कार्यकारी समीती.

२) **श्री. नितीन करीर,** भाप्रसे,
प्रधान सचिव–१, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती.

३) **डॉ. के. व्यंकटेशम,** भापोसे,
पोलीस आयुक्त, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.

४) **डॉ. दिपक म्हैसेकर,** भाप्रसे,
महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा सदस्य, कार्यकारी समिती.

५) **श्री. अश्विन मुदगल,** भाप्रसे,
आयुक्त, नागपूर महानगरपालिका तथा सदस्य, कार्यकारी समिती.

६) **श्रीमती कादंबरी बलकवडे,** भाप्रसे (विशेष निमंत्रित)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.

७) **श्री. मिलींदकुमार साळवे**
महाव्यवस्थापक, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा सचिव, कार्यकारी समिती.

**उक्त सभेत खालील निर्णय आणि ठराव करण्यात आले आहे. आणि ठरावाच्या अनुषंगाने नामप्रविप्रा व्दारे करण्यात आलेली कार्यवाही खालील प्रमाणे सादर आहे.**

| अ.क्र. | ठराव क्र. | विषय | ठराव | नामप्रविप्रा व्दारे केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १. | १/०१/०७.०६.२०१७ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारीणी समितीच्या अध्यक्ष व सदस्यांच्या अभिनंदनाबाबत. | कार्यकारी समितीने कार्यकारी समितीच्या अध्यक्ष व सदस्यांच्या अभिनंदनाच्या प्रस्तावास मान्यता दिली. | नोंद घेण्यात आली आहे. |
| २. | २/०१/०७.०६.२०१७. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाबाबतची प्रस्तावना. | कार्यकारी समितीने नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाबाबतच्या प्रस्तावनेचे अवलोकन केले आणि नोंद घेतली. | नोंद घेण्यात आली आहे. |
| ३. | ३/०१/०७.०६.२०१७. | महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा. ३) च्या कलम ७ च्या उपकलम (३)(दोन) नुसार मौजा – आवंडी – भवरी – गुमथळा, तह. कामठी, जि. नागपूर येथील जागेवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये नगर रचना परियोजना (Logistic Scheme) राबविण्यास मंजुरी मिळण्याबाबत. | कार्यकारी समितीने नागपूर महानगर प्रदेशातील तह. कामठी मधील मौजा–आवंडी, भवरी व गुमथळा येथील जागेवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ५९ ते १२२ अन्वये 'नगर रचना परियोजना' राबविण्यास व योजनांच्या व्यवहार्यतेचा अहवाल (Feasibility Report) प्राप्त करण्याकरीता सल्लागार यांची नियुक्ती करण्यास मंजुरी प्रदान केली. | सदर योजना राबविण्याबाबत योजनांचे व्यवहार्यतेचा अहवाल (Feasibility Report) प्राप्त करण्यात येत असुन योजना शक्यतेची तपासणी करण्यात येईल. |
| ४. | ४/०१/०७.०६.२०१७. | महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा. ३) च्या कलम ७ च्या उपकलम (३)(दोन) नुसार मौजा – गोंडखैरी – चिचभूवन – | कार्यकारी समितीने गोंडखैरी–चिचभूवन–पेंढरी या जागेवरील नागपूर सुधार प्रन्यास अधिनियमान्वये प्रस्तावित असलेली सुधार योजना रद्द करून त्याऐवजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना | शासन राजपत्रात तसेच स्थानिक वृत्तपत्रांमध्ये उक्त नगर रचना योजना (भाग II व भाग III) तयार करण्याच्या उद्देशाची घोषणा/ इरादा दिनांक १९.०१.२०१८ रोजी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पेंढरी, प्रस्तावित सुधार योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये नगर रचना परियोजना (Logistic Scheme) राबविण्यास मंजुरी मिळण्याबाबत. | अधिनियम, १९६६ च्या कलम ५९ ते ११२ अन्वये 'नगर रचना परियोजना' राबविण्यास व उक्त अधिनियमाच्या कलम ६० (१) अन्वये नगर रचना योजना राबविण्याचा इरादा घोषित करण्यास मान्यता प्रदान केली. तसेच, या योजनेचे नियोजन करण्याकरीता यापूर्वी नेमणूक केलेल्या मे. हॅल्क्रो कंपनी या सल्लागारांची सेवा चालू ठेवण्यासही मंजुरी दिली. | जाहीर करण्यात आलेला आहे. |
| ५. | ५/०१/०७.०६.२०१७. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत सुधार योजना सुमठाणा – कोतेवाडा – सोंडापार – जामठा – परसोडी (मिहान) यांना पाणीपुरवठा करण्यासाठी मौजा – शंकरपूर येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वॉटर फिडरपासून पिण्याच्या वाहीनी टाकण्याचे काम, तसेच या सुधार योजनेंतर्गत मुरूमाचे रस्ते तयार करण्याच्या कामास महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा. ३) च्या कलम ७ च्या उपकलम (३)(चार) नुसार मंजुरी | कार्यकारी समितीने नागपूर महानगर क्षेत्रांतर्गत सुधार योजनेतील रू. ४९.०० कोटी मुरूमाचे रस्ते टप्या–टप्याने व रू. ३२.२६ कोटी मुख्य जलवाहिनी टाकण्याच्या कामांसाठी प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता घेण्याच्या अटीस अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान केली व निविदा काढण्यास मंजूरी दिली.निविदा अंतिम करण्यापुर्वी प्राधिकरणाची मान्यता प्राप्त करावी असे ठरले. | १. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संकल्पचित्र करून घेण्यात आले आहे.<br>२. पाणि पुरवठयाचे अंदाजपत्रक तपासून घेण्यात येत आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | देणे. | | |
| ६. | ६/०१/०७.०६.२०१७. | महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ (२०१७ चा महा.३) च्या कलम ७ च्या उपकलम (३)(सात) नुसार कार्य किंवा कर्तव्ये पार पाडण्यासाठी मा. महानगर आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्याबाबत. | प्रकल्प आणि परियोजनांसाठीच्या प्रशासकिय मंजुरी व निविदांना मंजुरी किंवा नामंजुरी देणे– कार्यकारी समितीचे अध्यक्ष महोदयांना महानगर प्रदेशातील विकास कामासाठी विशेष बाब म्हणून रू. २५ कोटी पर्यंतच्या निविदांना मंजुरी किंवा नामंजुरी देण्याचे अधिकार प्रदान करणे तसेच महानगर आयुक्त यांना रू १० कोटी रकमेपर्यत प्रशासकीय मंजुरी देणे, निविदा बोलाविणे आणि निविदा रकमेच्या ५ टक्के जास्त दरापर्यंत निविदांना मंजुरी प्रदान करण्याचे अधिकार प्रदान करणे हे सर्व अधिकार मंजुर केलेल्या अंदाजपत्रकानुसार असावेत ही अट राहील.<br>कार्यकारी समितीने नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत विकास कामे, विकास प्रस्ताव, विकास परवानगी इ. दैनंदिन करावयाची कामे सुरळीत व सुचारूपणे पार पाडण्याच्या उद्देशाने प्रशासकीय अधिकार व प्रस्तावात नमूद सर्व अधिकार महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना प्रदान केलेत. या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल | नोंद घेण्यात आली आहे. विषय प्राधिकरणाचे बैठकीत मान्यतेकरीता ठेवण्यात आला त्यास दि. ६.११.२०१७ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ३ मधील अनु क्र. ६ अन्वये मान्यता प्राप्त. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | नियमीतपणे कार्यकारी समीती समोर सादर करावे असे ठरले. | |
| ७. | ७/०१/०७.०६.२०१७. | महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ (२०१७ च्या महा. ३) च्या कलम ७ उपकलम (३) (सात) नुसार, नागपूर महागनर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रांतर्गत तयार झालेली अनाधिकृत बांधकामे शोधून त्यांचे सविस्तर रिपोर्ट तयार करण्यासाठी एजेन्सीची नेमणूक करणे. | कार्यकारी समितीने प्रथम टप्प्यात दि. ३१.०८.२०१० ते आतापर्यंत नागपूर महानगर क्षेत्रात झालेले किंवा सुरु अनधिकृत बांधकाम अद्यावत उपलब्ध तंत्रज्ञानाच्या मदतीने, जसे Satellite Imagery (उपग्रह प्रतिमा), GPS (Global positioning System) भुमंडलीय स्थिती निधारण प्रणाली (Google Image) इत्यादीचा वापर करुन शोधणे, तसेच दि.३१.०८.२०१० पुर्वीचे मोठे बिनापरवानगी बांधकाम शोधून काढणे.<br>दुसऱ्या टप्प्यात प्रथम टप्प्यातील शोधलेल्या अनधिकृत बांधकामाचे वर्गीकरण करणे यात नियोजन प्राधिकरणाची मंजुरी न घेता पुर्णपणे अनधिकृत बांधकामे व नियोजन प्राधिकरणाची मंजुरी असली तरी प्रत्यक्ष बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे न करता फेरबदल केलेले असे वर्गीकरण प्रस्तावित आहे. पुर्णपणे अनधिकृत असलेले मौक्यावरील बांधकामाचे नकाशे तयार करुन अशी बांधकामे प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार मंजुरीस पात्र असल्यास | नोंद घेवून कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तुर्त MRSAC मार्फत महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात झालेली अनधिकृत बांधकामे Satelite Imagery व्दारे शोधण्यात येत आहेत. आवश्यकते प्रमाणे निविदा बोलावून पुढील कामे करण्यात येतील.<br>एकूण ७१४ गांवापैकी ६६७ गांवाचे ELU व PLU चे काम करण्यास आले आहे. |